जाणता राजा

छत्रपती शिवाजी महाराज



- संपादक -

डॉ. अनंत आत्माराम रिंढे

जाणता राजा : छत्रपती शिवाजी महाराज

■ डॉ. अनंत आ. रिंढे

■ प्रथम आवृत्ती – दि. १७ जून २०२३.

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 300/-

ISBN - 978-93-95494-38-0

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

अनुक्रमणिका

अ.क्र	लेख / लेखक	पृ.क्र.
1	Geographical Vision of Chatrapati Shivaji Maharaj **Dr. Manish Kanha Chavhan**	1
2	Administration System of Shivaji Maharaj **Dr. Pramod Rameshwar Chavan**	9
3	Shivaji Maharaj & His Resistance To Foreign Religious Fanaticism **Aparna Rajhans**	18
4	छत्रपती शिवाजी महाराजांचे लोक कल्याणकारी स्वराज्याचे व्यवस्थापन **प्रा. डॉ. प्रमोद मा. आचेगावे**	33
5	**स्वराज्य: लोककल्याणकारी राज्याची संकल्पना** **डॉ. अंबादास बाकरे**	37
6	छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी विषयक धोरण **डॉ.विठ्ठल एम. घिनमिने**	44
7	छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी व्यवस्थापन **डॉ. चंद्रशेखर आय. गिते**	51
8	छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनव्यवस्था **प्रा. डॉ. चांगुणा विठठल कदम**	56
9	शिवकालीन चलनव्यवस्था : एक एतिहासिक समालोचन **डॉ. विशाल अ.दौलतकर**	63
10	छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी धोरण **डॉ. प्रदीप ताकतोडे**	71
11	छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक नियोजन **प्रा. अविनाश पवार**	79

12	छत्रपती शिवाजी महाराज:पर्यावरणवादी दृष्टिकोन **डॉ.विशाखा संजय कांबळे**	89
13	शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि जिजाबाई **डॉ. प्रशांत सूर्यवंशी**	98
14	छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक विचार **डॉ. रविंद्र दा. इचे**	104

छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनव्यवस्था

प्रा. डॉ. चांगुणा विठठल कदम
इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.
मोबाईल नं. ९५२७७९७६८६ ईमेल – kadamcv.78@gmail.com

प्रस्तावना –

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात अराजक व गोंधळाची परिस्थिती होती. अशा परिस्थितीवर मात करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी केली. या राज्याचा कोकणपट्टीपासून ते पूर्वेकडील समुद्रकिनारपट्टीपर्यंत विस्तार केला. साम्राज्यविस्ताराबरोबरच राज्याच्या व्यवस्थापनाकडे शिवाजी महाराजांनी तितक्याच गांभीर्याने लक्ष दिले. त्याचबरोबर मध्ययुगीन काळात उत्कृष्ट अशी प्रशासनव्यवस्था त्यांनी निर्माण केली. प्रशासन यंत्रणा केवळ प्रशासनापुरती मर्यादित न ठेवता संबंधित अधिकाऱ्यांनी अहोरात्र रयतेच्या कल्याणाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे, हा विचार महाराजांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये रूजविला.

प्रस्तुत शोधनिबंधात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनव्यवस्थेचे विविध पैलू अधोरेखित केलेले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनव्यवस्थेची उदयप्रक्रिया –

सोळाव्या शतकात मराठा स्वराज्याची उभारणी करीत असताना शिवाजी महाराजांनी लोकाभिमुख प्रशासन पध्दतीचा विचार प्रकर्षाने केलेला दिसून येतो. मुघलकालीन प्रशासन पध्दतीतील काही चांगल्या गोष्टी अंगिकारून मनसबदारी पध्दतीतील दोषपूर्ण गोष्टींवर विचारमंथन करूनच शिवकालीन प्रशासनव्यवस्था आखण्यात आली किंवा स्वीकारण्यात आली असावी. जर प्रशासकीय व्यवस्था काटेकोर लावली नाही तर जिंकलेला प्रांत मोगल व इतर शाहयांकडे जाऊ नये तसेच मराठयांनी जिंकलेल्या प्रांतावर मराठयांचे दुर्लक्ष झाल्याबरोबर तो प्रांत पराजित शत्रूने नव्याने जिंकून घेतल्याचे दिसून येते. यातूनच पुढे भविष्यात मराठेशाहीच्या अधोगतीला सुरूवात झाल्याचे दिसून येते. स्वराज्याच्या वृध्दीबरोबर त्याची प्रशासकीय व्यवस्था लावणे शिवाजी महाराजांना आवश्यक वाटले. स्वराज्य विस्ताराबाबत १६९४ मध्ये लिहिलेल्या शिवचरित्रात कृष्णाजी अनंत सभासद यांनी सांगितले आहे की, "सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदी अलिकडे वरघाट, तळघाट, तुंगभद्रा पावेतो एक प्रांत व चंदी वेलोर ते कावेरीनदीपर्यंतचा एक प्रांत असे दोन प्रांत स्वराज्यात

केल्या जात. अष्टप्रधानांच्या नेमणुकीमध्ये तीन प्रमुख सूत्रे होतीत्र एक म्हणजे न्यायाधीश व पंडितराव सोडून इतरांनी युध्दात सहभाग घ्यावा. दुसरे म्हणजे लष्करी कामाबरोबरच दिवाणी कारभार व्यवस्थित चालविण्यासाठी प्रधान मंडळाची रचना आणि तिसरे म्हणजे अंतर्गत व बाहय शत्रूंवर वचक ठेवणे. याला शिवरायांची सामर्थ्यनीती असे म्हअले जाते. शिवकालीन केंद्रिय प्रशासनात राजा हे सर्वोच्च पद होते. राजा राज्याचे मस्तक आहे असा उल्लेख शुक्रनीतीसार ग्रंथात आहे. त्यामुळे शिवकाळात राजा हाच सर्वोच्च अधिकारी होता. तो राज्ययंत्रणेचा आधार होता. राजा हाच सामाजिक, राजकीय, धामिक व न्यायविषयक क्षेत्रात सर्वोच्च अधिकारी असे. प्रजेचे पालन पोषण, राज्यातील अनिष्ट चालीरीतींचे निर्मूलन, निपक्षपाती न्यायदान, सामाजिक सलोखा निर्माण करणे, प्रजाहितदक्ष राज्यकारभार इ. राजाची कर्तव्ये होती.

शिवाजी महाराजांनी शुक्रनीती, याज्ञवाल्क्यस्मृती आणि इतर धर्मशास्त्रांचा व मुस्लिम राज्यकर्त्यांच्या राजवटीत असलेल्या मंत्रिमंडळाचा विचार करून आपले आगळेवेगळे वैशिष्टयपूर्ण असे अष्टप्रधान मंडळ बनवले. रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात नमूद करतात की, "विविध प्रकारची राज्याची कार्ये केवळ राजानेच करणे शक्य नाही, तेव्हा राज्यकारभार चालविण्यासाठी प्रधान नेमावेत, आपल्या सत्तेप्रमाणेच त्यांचीही सर्वांवर सत्ता चालावी."[२] या धोरणाला अनुसरून शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. अष्टप्रधान मंडळाच्या हाताखाली १८ कारखान्यावर अधिकारी व १२ महाल असत.

शिवकालीन प्रांतिय प्रशासन व्यवस्था –

स्वराज्याचा कारभार व्यवस्थित करता यावा म्हणून स्वराज्याचे चार प्रशासकीय विभाग पाडले होते. त्यांना सरसुभा अशी संज्ञा होती. त्यावरील प्रमुखांना सरसुभेदार असे म्हणत असत. सुभ्याचे राज्यकारभाराच्या सोयीसाठी अनेक परगण्यात विभाजन केलेले होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे २९ परगणे निर्माण केले होते. परगण्याचे अनेक महालात रूपांतर केलेले होते. शिवकाळात प्रांतिय प्रशासन यंत्रणेतील गाव हा सर्वात शेवटचा घटक होता. सरसुभेदार, हवालदार, कमाविसदार, हे प्रांतिय प्रशासनाचे प्रमुख असून त्यांच्या मदतीसाठी दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जमादार, पोतनीस या अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असे.

शिवकालीन स्थानिक प्रशासन व्यवस्था –

मध्ययुगीन काळात खेडी स्वयंपूर्ण होती. गाव पातळीवर पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौगुला, शेटे, महाजन तसेच १२ बलुतेदार इत्यादी प्रकारचे अधिकारी व सेवक असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्यवर्ती आणि प्रांतिक

प्रशासनात बदल केले पण स्थानिक प्रशासनव्यवस्थेत हस्तक्षेप केला नाही. एखाद्या गावी कुलकर्णी नसेल तर सरकार तेथे एका अधिकाऱ्यांची नेमणूक करीत त्यास यार्दी असे म्हणत असत.

शिवकालीन न्यायदान व्यवस्था –

शिवकाळात राजकीय व लोकारूढ अशी दोन प्रकारची न्यायालये होती. स्थानिक स्वरूपाच्या न्यायव्यवस्थेत गोतसभा आणि गावपंचायती महत्वाच्या होत्या. न्यायव्यवस्थेसाठी स्वतंत्र मंत्री व्यवस्था अस्तित्वात होती. राजदंड, देवदंड, जातीदंड असे शिक्षेचे विविध प्रकार होते.

शिवकालीन लष्करी प्रशासन व्यवस्था –

कोणत्याही राज्याचे यशापयश देशाच्या मुलकी व लष्करी व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्कर मुख्यत्वेकरून पायदळ व घोडदळामध्ये विभागण्यात आलेले होते. शिवकालीन लष्करात पायदळाचे अत्यंत महत्वाचे स्थान होते. महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशात पायदळ अधिक प्रभावी ठरत असे. जिंकलेल्या प्रदेशाचा ताबा घेणे, किल्ल्यांची व्यवस्था पाहणे, किल्ल्यांचे संरक्षण करणे ही सर्व कामे पायदळाला करावी लागत. नाईक, हवालदार, जुमलेदार, हजारी, पंचहजारी, सेनापती अशी पायदळातील अधिकाऱ्यांची श्रेणी होती. शिवकाळात घोडदळात बारगीर व शिलेदार हे दोन प्रकारचे घोडेस्वार होते. हवालदार, जुमलेदार, एकहजारी, पंचहजारी, सरनोबत अशी घोडदळातील सैन्यांची रचना होती. रामचंद्रपंत अमात्यांनी लिहिलेल्या आज्ञापत्रात लष्कर विषयक धोरणासंबंधी एक स्वतंत्र परिच्छेद आहे. अमात्य लिहितात, "तऱ्हेवाईक, शेरखोर, अमर्याद, बालभाष्य, व्यसनी, कुचोद्य, कुचाळया करणार व एका धन्यापासून हरामखोरी करून आला असे लोक हुजूरातीत एकंदर ठेवूच नयेत."[३] छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी व्यवस्थेत घोडदळ पायदळाबरोबरच किल्ले, आरमार आणि हेरखात्याला अधिक महत्व होते. शिवकालीन लष्कराबाबत वा. कृ. भावे यांनी पुढील आकडेवारी दिली आहे. "एकंदर सैन्यात घोडेराऊत संख्या १ लक्ष, ५ हजार, हशम व मावळे आणि हत्ती १२६०. पायदळात घाटमाथ्यावरील मावळे आणि कोकणातील हेटेकरी लोकांचा अधिक भरणा होता. शिपाई हा पायदळातील सर्वात लहान घटक असे."[४]

सैन्या द्विना नैव राज्यं न धनं न पराक्रम. हे शुक्राचार्यांचे वचन सैन्याचे महत्व विशद करते. याचाच अर्थ सैन्याशिवाय राज्य, धन, पराक्रम यास काहीच अर्थ नसतो. अन्यथा राष्ट्राची अवस्था निष्प्राण कलेवरासारखी होईल. सैन्यबळामुळे राष्ट्राचे संरक्षण, राष्ट्राचा विस्तार आणि राष्ट्रात शांतता सुव्यवस्था निर्माण करून कायद्याचे राज्य

निर्माण करता येते. याची पुरेपूर जाणीव शिवाजी महाराजांना होती. म्हणूनच त्यांनी उत्तम लष्करी यंत्रणा निर्माण केली होती.

शिवकालीन किल्ले प्रशासन व्यवस्था –

मध्ययुगीन युध्द पध्दतीत संरक्षणाच्या दृष्टीने गड कोट दुर्गांना महत्वाचे स्थान होते. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या रणनीतीत 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असे मानले जात होते. कारण अमात्य सांगतो ,"दुर्गे नसता मोकळा देश, परचक्र येताच निराश्रय, भग्न होऊन देश उध्वस्त होतो. देश उध्वस्त झाल्यावर राज्य कोण्हास म्हणावे? याकरिता पूर्वीचे राजे जाले त्याणी आधी देशांमध्ये दुर्गे बांधून देश शाश्वत करून घेतला, आले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले."[५]

" किल्ल्याच्या आश्रयाने एक सशस्त्र सैनिक शंभर सैनिकांसोबत लढू शकतो. व १०० योध्दे दहा हजार माणसांशी लढू शकतात. यास्तव राजाने किल्ल्याचा आश्रय करावा असे शुक्राचार्यांनी म्हटले आहे."[६] प्रत्येक किल्ल्यासाठी शिवाजी महाराजांनी तीन अधिकारी नेमण्याची प्रथा रूढ केली होती. हे तीन अधिकारी म्हणजे हवालदार, सबनीस आणि कारखानीस होय. गडांचे प्रशासन हे एका अर्थाने संयुक्त प्रशासन होते. कारण हवालदार, सबनीस आणि कारखानीस हे तिन्ही अधिकारी समान दर्जाचे होते. या तिघांना मिळूनच गडाचा कारभार पहावा लागत असे. शिवकाळात किल्ला म्हणजे एक छोटेसे राज्यच असे. ग्रॅट डफ नावाचा इतिहासकार या संदर्भात म्हणतो की, "किल्ल्यातून आत बाहेर कोणी केव्हा जाणे, गस्त फिरणे, चौक्या सांभाळणे व त्यावर देखरेख ठेवणे, पाणी, धान्य, सामग्री, युध्द सामग्री तयार ठेवणे इत्यादीबद्दल सक्तीचे व सूक्ष्म नियम शिवाजीने केले होते."[७] राज्याच्या संरक्षणासाठी गड, किल्ले महत्वाचे आहेत या जाणिवेतून छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक किल्ल्यांच्या बांधणीस प्रारंभ केला. त्यांच्या राज्यात गिरीदुर्ग, भूईकोट, जलदुर्ग या किल्ल्यांच्या प्रकारांचा समावेश होता. किल्ल्यांची व्यवस्था ठेवण्यासाठी त्यांनी उत्तम यंत्रणा बनविली होती. या यंत्रणेनुसार हवालदार, सबनीस, कारखानीस, सरनोबत, शिबंदी हे किल्ल्यांचे अधिकारी वर्ग होते. गडाच्या पायथ्यास संरक्षक चौक्या असत. त्यावर पहारा देण्यासाठी महार, मांग, रामोशी, तराळ, ठाकर, भिल्ल असे लोक ठिकठिकाणी तैनात केले होते. गडावरील गरजा लक्षात घेऊन कारागीर वर्ग ठेवण्यात आला होता.

शिवकालीन आरमार व्यवस्था –

दुर्ग प्रशासनाप्रमाणेच शिवाजी महाराजांनी आरमार प्रशासनावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते. शिवाजी महाराजांच्या पूर्वीपासून दर्यावर्दीपणाचे ज्ञान भारतीयांना होते, अर्थात असे असून देखील उत्तरेतील किंवा दक्षिणेतील राजांनी समुद्रावर आपली बळकट सत्ता उभारली नव्हती. याचा फायदा घेऊन इंग्रज, पोर्तुगीज, डच व फ्रेंच

यांनी समुद्रकिनाऱ्यावर आपल्या सत्ता प्रस्थापित केल्या. पाश्चिमात्यांकडून प्रेरणा घेऊन शिवाजी महाराजांनी आरमार उभारणी करून सागरावर आपले वर्चस्व स्थापन केले. शिवाजी महाराजांनी आरमाराची उभारणी करून मराठ्यांच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासात नवीन पर्व सुरू केले. डॉ. बाळकृष्ण यांनी 'The father of the Maratha navy' असे शिवाजी महाराजांचे वर्णन केलेले आहे. शिवाजी महाराजांना समुद्र मार्गावरील हालचालींची व जिवटपणाची जाणीव झाली होती. यातच महाराजांचा दूरदृष्टीपणा दिसून येतो. सर जदुनाथ सरकार या संदर्भात म्हणतात,"Nothing proves shivaji's genius as a born stateman more clearly than his creation of Navy and naval bases,"[८]

शिवाजी महाराजांच्या आरमाराचे विस्ताराने वर्णन आज्ञापत्रात आढळते. १६६५ मध्ये शिवाजी महाराजांच्या आरमारात ८५ लहान मोठी गलबते होती. सागरी लढयात प्रभुत्व गाजविण्याच्या दृष्टीने शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग यांसारखे नवीन जलदुर्ग बांधले. सागरी जीवनाशी निगडित असणारे कोळी, भंडारी यांसारखे लोक शिवरायांच्या आरमारात कार्यरत होते. आरमाराचे महत्व सांगताना रामचंद्रपंत अमात्य यांनी म्हटले आहे की,"आरमार हे एक स्वतंत्र राज्यांगच आहे. ज्याच्याजवळ जसे बळ तसे त्याची वृध्दी होते. त्याप्रमाणे आरमार त्याचा समुद्र."[९]

निष्कर्ष –

१. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तसेच उत्कृष्ट प्रशासक होते.
२. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करत असताना राज्यकारभारात प्रशासन व्यवस्थेला अधिक महत्व दिले.
३. शिवकाळात सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून प्रशासन चालविले जात होते.
४. शिवकालीन प्रशासनातील न्यायव्यवस्था आदर्श स्वरूपाची होती.
५. शिवकालीन प्रशासनव्यवस्था लोकशाही तत्वाला अनुसरून होती.
६. शिवकालीन किल्ले व आरमार प्रशासनातून शिवाजी महाराजांची दूरदृष्टी प्रत्ययास येते.
७. छत्रपती शिवाजी महाराजांनी पूर्वीच्या प्रशासनातील दोष बाजूला सारून आपल्या प्रशासनात आमूलाग्र बदल केले.

संदर्भ टिपा –

१. अरूणा मोरे, श्रीहरी थोरवत, मराठयांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीयावृत्ती, २००४, पृ.२०१.

२. गफुर शेख, मराठयांचा इतिहास, प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती, २००५, पृ. २३६.
३. अ.रा. कुलकर्णी, (संपा.), आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, सुधारित आवृत्ती, २००७, पृ. ११५.
४. सोमनाथ रोडे, मराठयांचा इतिहास, पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८, पृ. १८०.
५. अरूणा मोरे, श्रीहरी थोरवत, पूर्वोक्त, पृ. २०५.
६. अ.रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००४, पृ. ६६.
७. सोमनाथ रोडे, पूर्वोक्त, पृ.१८२.
८. अ.रा. कुलकर्णी, (संपा.), मराठयांचे इतिहासकार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००७, पृ. ६६.
९. प्र. न. देशपांडे, मराठयांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, २००१, पृ. १८६.
१०. बी. एन. सरदेसाई, मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००१.
११. शं. ना. जोशी, (संपा.), कृष्णाजी अनंत सभासद विरचित आद्य छत्रपती श्री. शिवाजीराजे भोसले यांची बखर, वरदा प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती, २०१९.